# द्वितीय सराव परीक्षा 2018-2019

वर्ग : 10 वा

वेळ : 3 तास | विषय :- मराठी (द्वि.भा.) | गुण : 100

---

सुचना :- * सुचनेनूसार आकलनकृती व व्याकरण या मधील आकृत्या काढाव्यात.
* आकृत्या पेननेच काढाव्यात.
* उपयोजित लेखनातील प्रश्नांसाठी (सूचना निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच हे प्रश्न लिहून घेऊ नये.
* स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे लक्ष द्यावे.

(विभाग – 1 : गद्य)

## प्र. 1 ला. अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.

1) आकृती पूर्ण करा. 2

i) पावडेकांकाच्या पावलांची वैशिष्टे → 1) ____ 2) ____

ii) रेखामावशींच्या पावलांची वैशिष्टे → 1) ____ 2) ____

''सॉरी, मावशी खरंच सॉरी,'' आपण त्यांच्या मळकट पायांबद्दल बोललो याचं स्नेहललाही कसंतरी वाटलं. तिला टाचेला फाटलेली, अगदी पातळ झालेली त्यांची चप्पल आठवली. रेखामावशीच्या खणखणीत आवाजानं सुमितही जागा झाला आणि हॉलमध्ये आला. सगळा प्रकार त्याच्या लक्षात आला. तेवढ्यात पावडेकाकाही आहे. आज बाबा आणि पावडेकाका कुठल्याशा कार्यक्रमाला जाणार होते. स्नेहलने पावडेकाकांना पाणी दिलं. फरशी पुसणाऱ्या रेखामावशींचं लक्ष पावडेकाकांच्या तळव्याकडं गेलं. एकदम गोजिरा, गुलाबी तळवा. कुठं चिरण्या नाहीत की काही नाही ! 'एकदम लोन्यागत पाय हाय काकांचा', रेखामावशी स्वतःशीच पुटपुटल्या. त्यांनी स्वतःच्या पायाकडं पाह्यलं... पायाला किती तरी चिरण्या पडल्या होत्या... माती धूळ बसून त्या काळ्या पडल्या होत्या. अभिषेक–स्नेहलचे बाबाही तयार होऊन हॉलमध्ये आले.

''मामा, मी एक ॲप तयार केलं आहे. त्या ॲपच्या साह्यानं आपण कोणाचे पाय किती स्वच्छ आहेत, हे सांगू शकतो'', सुमितनं सांगितलं. ''सुमित, अरे, पाय स्वच्छ आहेत की नाही, हे सांगायला ॲपची काय गरज आहे ? तुम्हां टेक्नोसॅव्ही लोकांना कशाचंही ॲप करण्याशिवाय काही सुचतं की नाही ? अरे, सगळ्यात भारी ॲप डोक्याच्या कवटीत आहे, हे विसरलात की काय तुम्ही लोक ?'' बाबांनी अनाठायी टेक्नॉलॉजीबद्दलची आपली मळमळ व्यक्त केली.

''मामा, गंमत तर बघ तू माझ्या ॲपची... त्याचं नाव आहे फूटप्रिन्टस'', असं म्हणत सुमितनं आपला स्मार्टफोन काढला.

2) चौकटी पूर्ण करा : 2

i) सुमितच्या मोबाईलमधील ॲपचे नाव ____

ii) बाबांच्या मते, सगळ्यां भारी ॲप ____

iii) अभिषेकच्या घरी काम करणारी बाई ____

iv) बाबांच्या मित्रांचे नाव ____

Previous Pathshala

3) पुढील शब्दांचे विरूद्धार्थी शब्द उताऱ्यातून शोधून लिहा. 2

i) घट्ट x -------  ii) पांढऱ्या x -------

iii) दुर्लक्ष x -------  iv) अस्वच्छ x -------

4) अभिषेकच्या बाबांना टेक्नॉलॉजीबद्दल असलल्या मळमळीबद्दल तुमचे मत लिहा :

## आ) उताऱ्याच्या आधारे कृती करा.

1) आकृती पूर्ण करा. 2

भडसावळे गुरूजींच्या मते
सकाळची वेळ अभ्यासाला योग्य असते. कारण –

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |

पहाटेची, सकाळची वेळ अभ्यासाला योग्य असते, हा भडसावळे गुरूजींनी दिलेला सल्ला अगदी योग्य होता. सकाळच्या टवटवीत आणि प्रसन्न वातावरणात अभ्यास खूप छान होतो. शरीरही पुरेशा विश्रांतीमुळे ताजंतवानं बनलेलं असतं. प्रसन्न वातावरणामुळे मनही अभ्यासत चटकन लागू शकतं. हवेत सुखद गारवा असतो. दुरून एखादी भूपाळी किंवा रेडिओवरचं आवडतं भक्तिगीत ऐकू येत असतं. ते नसेल तर पक्ष्यांच सुमधुर संगीत साथीला असतंच. अशा आल्हाददायक वातावरणात संस्कृतचा एखादा श्लोक चटकन पाठ होतो. एरवी न कळलेलं गणित चटकन कळतं. त्याची रीतही लक्षात राहते, हा निरंजनचा अनुभव. त्यामुळेच भडसावळे गुरूजींचा हा सल्ला त्याला मोलाचा वाटे.

निरंजनची गुरूजींवर अपार श्रद्धा होती. तसं गुरूजींचंही निरंजनवर खूप प्रेम होतं. तो त्यांचा लाडका विद्यार्थी होता, कारण तो अतिशय प्रामाणिकपणे काम करायचा आणि अभ्यासही. या जगात त्याचं असं कुणी नव्हतंच. दूरदूरच्या नात्यातल्या एका मावशीच्या घरी चिपळूण शहरालगतच्या एका उपनगरात तो राहयचा. गावापासून दूर डोंगराच्या पायथ्याशी हे मावशीचं घर होतं. आईवडील लहानपणीच वारले. काही दिवस मामाने सांभाळ केला आणि मग कामासाठी म्हणून चिपळूणला आणलं. या मावशीकडे आणून सोडलं आणि तोही मुंबईला निघून गेला तो कायमचाच. जाताना मोलाचा सल्ला मात्र देऊन गेला – 'रडत बसू नको. शेण, गोठा वगैरे जी पडतील ती सारी कामं कर मावशी देईल ते खा आणि इथंच रहा. मावशी तुला शाळेतही घालणार आहे.'

2) एका वाक्यात उत्तरे लिहा : 2

i) निरंजनच्या मावशीचे घर कोठे होते ?

ii) निरंजनला शाळेत कोण घालणार होते ?

3) जोड्या लावा. 2

प्रसन्न  गारवा  श्रद्धा
विद्यार्थी  सुखद
[illegible]  लाडका  अपार

| | विशेषण | विशेष्य |
|---|---|---|
| i) | ------ | ------ |
| ii) | ------ | ------ |
| iii) | ------ | ------ |
| iv) | ------ | ------ |

4) तुम्हांला अभिप्रेत असलेली आदर्श विद्यार्थ्यांची गुणवैशिष्ट्ये लिहा : 2

Previous Pathshala

**अपठित गद्य**

## इ) उतारा वाचून त्यावरील कृती करा.

1) वैशिष्ट्ये लिहा. 2

| विद्वत्तेची वैशिष्ट्ये | | | |
|---|---|---|---|
| | | | |

विद्वत्ता कोणाकडेही असो ती क्षणात मिळवता येणारी बाब नाही. ज्याप्रमाणे झाडाची मुळे एकदम खोल-खोल जाऊ शकत नाहीत, त्यासाठी महिने-वर्षे लागतात; परंतु जेवढी खोल मुळे असतात, तेवढा त्या झाडाचा पाया भक्कम असतो. तसेच विद्वत्तेचेही आहे. जेवढ्या प्रयत्नाने ती मिळवाल तेवढे प्रभावी तुमचे व्यक्तिमत्त्व असेल. आपल्याला एकदाच विजेसारखे चमकायचे, की सूर्यासारखे सातत्याने प्रकाशित राहायचे, हे ठरवायचे आहे. विद्वत्ता ही अशी बाब आहे, जी केवळ वेळेच्या सदुपयोगाने मिळते. बरे, तिला कोणी तुमच्याकडून काढून किंवा चोरून घेऊ शकत नाही. ती मिळवण्यात खूप धनसंपत्ती खर्ची घालावी लागत नाही; पण एकदा ती तुमच्याजवळ आली, की संपूर्ण राष्ट्र तुमच्या लखलखत्या प्रकाशात दिपून जाते. आपला कोणी सन्मान करावा अशी भावनाच मनातून निघून जाते, सर्वजण तुमच्या सहवासात येण्यासाठी, तुमचे आदरातिथ्य करण्यासाठी आतुर असतात. थोडक्यात, विद्वत्ता तुम्हांला सर्व मिळवून देते, जयाची तुम्ही स्वप्नातही अपेक्षा केलेली नसते.

2) खालील घटनेचा परिणाम लिहा : 2

| घटना | परिणाम |
|---|---|
| i) झाडाची मुळे खोल जाणे. | i) ------------ |
| ii) प्रयत्नांनी विद्या मिळवणे. | ii) ------------ |

3) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांची जात ओळखा. 2

<u>संपूर्ण</u> <u>राष्ट्र</u> <u>तुमच्या</u> <u>लखलखत्या प्रकाशाने</u> दिपून जाईल

| शब्द | शब्दांची जात |
|---|---|
| ------- | ------- |
| ------- | ------- |
| ------- | ------- |
| ------- | ------- |

4) स्वमत 2

व्यक्तीला विद्या प्राप्त झाल्यानंतर कोणकोणत्या गोष्टी मिळू शकतात ते स्पष्ट करा :

**(विभाग - 2 : पद्य)**

## प्र. 2 रा. अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा : 2

1) चौकटी पूर्ण करा.

i) पिलांकडे झेपावणारी - [ ]   ii) वनात लागणारा - [ ]

iii) भुकेले झालेले - [ ]   iv) यासाठी हरिणी चिंतेत झाली - [ ]

Previous Pathshala

अग्निमाजि पडे बाळू ।
माता धांवें कनवाळू ।।१।।
तैसा धांवें माझिया काजा ।
अंकिला मी दास तुझा ।।२।।
सर्वेंचि झेंपावें पक्षिणी ।
पिलीं पडतांचि धरणीं ।।३।।
भुकेलें वत्सरावें ।
धेनु हुंबरत धांवे ।।४।।
वणवा लागलासे वनीं
पाडस चिंतीत हरणी ।।५।।
नामा म्हणे मेघा जैसा ।
विनवितो चातक तैसा ।।६।।

2) कोण ते लिहा. 2

i) परमेश्वराचे दास [ ] ii) मेघाला विनवणी करणारा [ ]

iii) संत नामदेवांनी ज्यांना विनवले [ ] iv) सकलसंतगाथेचि संपादक [ ]

3) संत नामदेवांनी परमेश्वराकडे केलेली विनंती सोदाहरण स्पष्ट करा. 2

4) पक्ष्याच्या/प्राण्याच्या आपल्या पिलांशी असलेल्या संबंधाबाबत तुमचा अनुभव लिहा. 2

**आ) 'दोन दिवस' 'हिरवगार झाडासारखं' या दोन कवितापैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील मुद्दयांना अनुसरून कृती करा.** 8

1) प्रस्तुत कवितेचे कवी / कवयित्री 1

2) कवितेचे रचना प्रकार 1

3) कवितेचे विषय 1

4) कवितेतून व्यक्त होणारा भाव (स्थायिभाव) 1

5) कवितेतून व्यक्त होणारा विचार 2

6) कवितेतील आवडलेली ओळ 2

**इ) खालील ओळीचे रसग्रहण करा :** 4

मिळेल पैसा, मिळेल दौलत, यंत्रांच्या संगती
आभाळाच्या छत्राखालीख, एक अनोखी तुष्टी...
रंग मजेचे, रंग, उद्याचे.

Previous Pathshala

## विभाग – 3 : स्थुलवाचन

**प्र. 3 रा) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** 6

1) पणतीच्या उदाहरणातून कवितेत व्यक्त झालेला विचार स्पष्ट करा ?

2) थोड्याशा पाण्यावर कसे वाढावे याचा नमुना कॅक्टस ! या विधानाची यथार्थता लिहा ?

3) टीपा लिहा.

व्युत्पत्ती कोशाचे कार्य

## विभाग – 4 : भाषाभ्यास

**प्र. 4 था. अ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.**

1) समास

1) खालील तक्ता पूर्ण करा : 2

| सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|
| i) खरेखोटे | ------- | ------- |
| ii) प्रतिदिन | ------- | ------- |

अलंकार

2) खालील उदाहरण वाचून कृती करा. 2

लहानगी वसुधा जणू गोड परीच !

i) उपमेय ----------  ii) उपमान ----------

iii) साधर्म्यवाचक शब्द ----------  iv) अलंकार ----------

3) वाक्यरूपांतर 2

कंसातील सुचनेप्रमाणे कृती करा :

i) किती सुंदर आहे ताजमहाल ! (विधानार्थी करा)

ii) शाळेत नियमित जावे. (आज्ञार्थी करा)

4) सामान्यरूप 2

अधोरेखित शब्दांचे सामान्यरूप, मूळशब्द लिहून तक्तापूर्ण करा.

मला सकाळी झाडावर पक्ष्यांचा किलबिलाट ऐकू आला.

| शब्द | मुळशब्द | सामान्यरूप |
|---|---|---|
| i) झाडावर | ------ | ------ |
| ii) पक्ष्यांचा | ------ | ------ |

Previous Pathshala

वाक्प्रचार

5) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा : 2

लहानगी वसुधा जणू गोड परीच !

i) अंगाचा तिळपापड होणे ii) चेहरा पडणे

आ) 1) शब्दसंपत्ती 1

i) गटात न बसणारा शब्द

1) कथा, कविता, लेखक, नाटक, कांदबरी → [ ]

2) पिंपळ, वड, चिंच, आंबा, वृक्ष → [ ]

ii) खालील शब्दांपासून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा. 1

पानावरून – [ ] [ ]

iii) समानार्थी शब्द लिहा. 1

i) गोड = [ ] ii) जंगल = [ ]

iv) 'कार' प्रत्यय असलेले दोन शब्द लिहा. 1

[------ + कार = ------] [------ + कार = ------]

2) लेखननियमांनुसार लेखन 1

पुढील वाक्य लेखन नियमांनुसार लिहा :

i) तीला खबदारी घेणे अवश्यकच होते.

ii) अचूक शब्द ओळखा : 1

1) कनिष्ठ/कनिष्ट/कनीष्ट/कनीष्ठ [ ]

2) नीर्णय/निणर्य/निर्णय/नीणर्य [ ]

3) विरामचिन्हे 1

i) खालील वाक्यातील विरामचिन्हे ओळखून लिहा.

काय ? फारच भयंकर कल्पना ही !

ii) खालील वाक्यात योग्य विरामचिन्हे वापरून वाक्य पुन्हा लिहा.

पाय वाळक्या काटकीवर पडून कट असा आवाज आला.

4) पारिभाषिक शब्द 1

पारिभाषिक शब्दांचा अर्थ प्रचलित मराठी भाषेत लिहा :

i) Index - [ ] ii) Exhibition - [ ]

5) अकार विल्हे 1

पुढील शब्द अकारविल्हे प्रमाणे लावा.

फली, चेंडू, मैदान, क्रिकेट.

Previous Pathshala

## विभाग – 5 : उपयोजित लेखन

**प्र. 5 वा. अ)**

1) पत्रलेखन 5

पुढील निवेदन वाचा व त्याखालील कृती करा.

अ आ इ ई

**मराठी सुलेखन वर्ग**

कालावधी
१ मे ते
३१ मे

विनय ॲकॅडमी आयोजन

*** संपर्क ***

श्री. विनय गायकवाड

२, सोमवार पेठ, कराड

भ्रमणध्वनी – 8844 00x xxx

माफक फी

किंवा

| विद्यार्थी या नात्याने या वर्गात प्रवेश देण्याची विनंती करणारे पत्र लिहा. | विद्यार्थी या नात्याने 'मराठी सुलेखन वर्गाचा' खूप फायदा झाला. तर आभार मानणारे पत्र लिहा. |
|---|---|

2) पुढील उताऱ्याचा 1/3 इतका सारांश तुमच्या शब्दांत लिहा. 5

विचाराने एखादी गोष्ट समजावून दिली की ती माणसाला पटते. समजावून देण्याऐवजी भय दाखवून, मार देण्याची भीती दाखवून पटवण्या प्रयत्न केला, तर भीती निर्माण होते; भीती न दाखवावी; तर माणूस स्वच्छंदी बनतो, सिंहाचे बळ त्याच्या दातांत आहे. हत्तीचे सामर्थ्य सोंडेत आहे. गायी–बैलांची त्यांच्या शिंगात आहे तसेच मानवाचे सर्वस्व कोणते–तर माणसाची शक्ती, ती त्याच्या बुद्धीत आहे. शारीरिक शक्तीला मर्यादा असते, पण बुद्धीला मर्यादा नसते. म्हणून माणूस प्राण्यांचा राजा बनला. या पृथ्वीवर राज्य करू लागला. पण याच बुद्धीमुळे माणूस अहंकारी बनला. बुद्धीचा वाईट उपयोग करू लागला. निर्बुद्धपणाने वागून तो आपले सामर्थ्य न ओळखील तर आपली शक्ती तो गमावून बसेल. माणसाच्या या बुद्धीसामर्थ्याचा नीट मार्गावर ठेवण्यासाठी जो प्रयत्न केला जातो तो सत्याग्रह किंवा सत्यदर्शन !

**आ) खालील कृती सोडवा :** 6

1) खालील विषयाच्या आधारे आकर्षक जाहिरात तयार करा :

'शालेय पुस्तक भांडार'

2) पुढील मुद्द्यांवरून गोष्ट लिहा : (८० ते १०० शब्दमर्यादा) 6

मुद्दे :- एक मुलगा ----- आई बरोबर झोपडीत राहाणे ----- पावसाळ्याचे दिवस ----- भयंकर वारा व पाऊस ----- रेल्वेचे रूळ उखडणे ----- त्याच्या नजरेस येणे ----- अंगात तांबडा शर्ट ----- आगगाडी थांबवणे ----- प्रवाशांचा संताप----- रूळ उखडलेले दिसणे ----- प्राण वाचणे ----- राष्ट्रपतीद्वारा मुलाचा सन्मान ----- तात्पर्य

Previous Pathshala


**प्र. 5 वा. इ) लेखन कौशल्य** 8

खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा (शब्दमर्यादा १०० ते १२० शब्द)

1) प्रसंगलेखन

* खालील प्रसंगी तुम्ही उपस्थित होता अशी कल्पना करून लेखन करावे.


'मी पाहिलेला अपघात'




2) कल्पनाप्रधान

मी पक्षी झाले तर --------

चौकटीतील मुद्द्यांच्या आधारे कल्पना करून आत्मकथनवर लेखन करा.




Previous Pathshala